# १२९ गुन्ह्यांचा आरोप असलेल्या कुख्यात गुन्हेगाराला तीन वर्षांचा कारावास

**महाराष्ट्रासह मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये गुन्हेगारीचे जाळे; घरफोडी प्रकरणात न्यायालयाचा निकाल, पोलिस पथकाला २५ हजारांचे बक्षीस**

**नागपूर:**महाराष्ट्रासह मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये गुन्हेगारी कारवायांमुळे चर्चेत असलेल्या कुख्यात गुन्हेगार नरेश अंकलू महिलांगे (वय ३३, रा. कळमना, नागपूर) याला घरफोडीच्या एका प्रकरणात न्यायालयाने तीन वर्षांच्या सश्रम कारावासासह दंडाची शिक्षा सुनावली आहे. आरोपीविरुद्ध विविध राज्यांमध्ये एकूण १२९ गुन्हे दाखल असल्याची माहिती असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील १२०, तर मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधील नऊ गुन्ह्यांचा समावेश आहे. या निकालामुळे घरफोडीच्या गुन्ह्यांच्या तपासात पुरावे प्रभावीपणे सादर करणाऱ्या पोलिसांच्या कामगिरीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

**घरफोडी करून रोकड लंपास**

प्राप्त माहितीनुसार, ८ जानेवारी २०२१ रोजी रात्री नागपुरातील स्मॉल फॅक्टरी परिसरात मुकेश अग्रवाल यांच्या दुकानात घरफोडीची घटना घडली होती. आरोपीने दुकानाची खिडकी तोडून आत प्रवेश केला आणि ड्रॉवरमध्ये ठेवलेली रोकड चोरून नेली. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजसह अन्य तांत्रिक पुरावे गोळा केले. या पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्ध न्यायालयात खटला चालविण्यात आला.

**सीसीटीव्हीसमोर दाखवायचा वाकुल्या**

नरेश महिलांगे हा गुन्हा करताना चेहरा झाकण्यासाठी स्कार्फ किंवा अन्य कापडाचा वापर करत नसल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, गुन्हा केल्यानंतर घटनास्थळावरून निघताना तो सीसीटीव्ही कॅमेऱ्याकडे पाहून वाकुल्या दाखवत असल्याचेही समोर आले होते. त्याच्या या विचित्र वर्तनामुळे तो चर्चेत आला होता. चोरी, घरफोडी, लुटमार तसेच घातक शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यासारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग असल्याची माहिती आहे.

**तांत्रिक पुराव्यांमुळे गुन्हा सिद्ध**

या घरफोडी प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात तांत्रिक आणि अन्य महत्त्वाचे पुरावे सादर केले. सरकारच्या वतीने अ‍ॅड. वर्षा सायखेडकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. सादर करण्यात आलेले पुरावे आणि युक्तिवाद विचारात घेत सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. एच. ग्वालानी यांनी आरोपीला भारतीय दंड विधानाच्या कलम ४५७ आणि ३८० अंतर्गत दोषी ठरवून शिक्षा सुनावली.

कलम ४५७ अंतर्गत रात्री घरफोडी करण्याच्या उद्देशाने अनधिकृत प्रवेश केल्याप्रकरणी, तसेच कलम ३८० अंतर्गत चोरी केल्याप्रकरणी आरोपीला प्रत्येकी तीन वर्षांचा सश्रम कारावास आणि प्रत्येकी १० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. दंडाची रक्कम न भरल्यास प्रत्येकी तीन महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागणार असल्याचे वृत्तात नमूद आहे.

**पोलिस आयुक्तांकडून पथकाचे कौतुक**

घरफोडीच्या प्रकरणात प्रभावी तपास आणि पुराव्यांच्या आधारे आरोपीला शिक्षा मिळवून देण्यात पोलिसांना यश आले. या कामगिरीची दखल घेत पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी लकडगंज पोलिस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार मुकुंद कवाडे आणि त्यांच्या पथकाचे कौतुक केले. तसेच या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलिस पथकाला २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले.

विविध राज्यांमध्ये गुन्हे दाखल असलेल्या सराईत आरोपीला न्यायालयीन प्रक्रियेत दोषी ठरवून शिक्षा मिळवून देण्यात पोलिसांनी केलेल्या तपासाला या निकालामुळे महत्त्व प्राप्त झाले आहे. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि प्रभावी न्यायालयीन बाजू यांची भूमिका किती महत्त्वाची असते, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

# असहाय्य अश्रूंची नजरकैद

**नागपूर:**आपले घर, खेळाचे मैदान आणि आईचा पदर सोडून दूर आणलेल्या या मुलांना कोणत्याही सुरक्षेविना धोकादायक आणि अवजड कामे करायला भाग पाडले जाते. राहण्याच्या नावाखाली गुदमरणाऱ्या छोट्या खोल्यांमध्ये दहा-दहा मुलांना कोंबले जाते. कामाचा कोणताही नियम नाही. आजारी पडल्यावर औषधाची व्यवस्था रामभरोसे असते. मानवी हक्कांचे उघड उल्लंघन अधूनमधून होणाऱ्या कारवाईतून अधोरेखित होते. ट्रेनमध्ये किंवा रेल्वे स्थानकावर अथवा कारखाने, कंपन्यात संशयास्पद अवस्थेत बालके सापडतात. त्यानंतर चौकशी आणि कारवाईच्या नावाखाली कागदपत्रांचा गठ्ठा जमा होतो. मात्र, या कारवाईनंतर पुढे काय होते, ते पुढे येतच नाही. नमूद ठिकाणी या बालकांना कामावर जुंपण्यात कोण-कोण सहभागी आहेत, ते कधीच उघड होत नाही. शहरातील बड्या प्रस्थांचे नाव अशा प्रकरणात समोर आले की, यंत्रणांचे हात आपोआप आखडले जातात. गांधीबाग, तहसीलमधील असो, बुटीबोरी असो की वाडीच्या कंपनीतील कारवाई असो, तपासाची साखळी सूत्रधारांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच केस थंड बस्त्यात जाते. संबंधित विभागांची ही बोटचेपी भूमिका थेट तस्करांचे बळ वाढवणारी ठरत आहे.

**एनसीपीसीआर मोहीम अन् नागपुरातील कारवाई**

एनसीपीसीआरने १२ जून ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान देशभर विशेष पॅन इंडिया रेस्क्यू अँड रिहॅबिलिटेशन कँपेन राबविले. या मोहिमेत जिल्हाधिकारी, कामगार विभाग, पोलिस आणि अन्य यंत्रणांना बचाव कारवायांचा नियमित डेटा, एफआयआर, पुनर्वसन आणि शैक्षणिक पुर्नस्थापनेची माहिती सादर करण्यास सांगण्यात आले होते. देशभरात या मोहिमेत ३,८०० हून अधिक मुलांची सुटका आणि ५७५ हून अधिक एफआय झाल्याचे सरकारने ४ सप्टेंबरला जाहीर केले होते. नागपूर, विदर्भातील कारवाईचे स्वरूप फारच किरकोळ असल्याचे लक्षात येते.

# सरकार म्हणते, काटकसर करा; दुसरीकडे हिवाळी अधिवेशनाच्या कामावर वारेमाप खर्च



**प्रतिनिधी**

**नागपूर:**मोसमी पावसाच्या तुटीमुळे राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे सरकारने जाहीर केले असून अनेक कामांवरील खर्च कमी करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या. इतरही काही कामांवरील खर्च कमी करून तो दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश आहेत. परंतु हिवाळी अधिवेशनासाठी करण्यात येणाऱ्या कामांवरील खर्चात कपात करण्यात आली नाही. दुष्काळाची झळ विधानभवनाला बसणार नसल्याचे चित्र आहे.

राज्यात दुष्काळी स्थिती आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी विविध सवलती लागू केल्या आहेत. कर्जमाफीनंतर दुष्काळ निवारणासाठी होणाऱ्या खचार्मुळे सरकारच्या तिजोरीवर मोठा भार येणार आहे. त्यामुळे सरकारने काटकरीचे धोरण स्वीकारले असून दुष्काळ निवारणाच्या कामांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु याचा हिवाळी अधिवेशनाच्या कामावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे चित्र आहे. दोन आठवड्यांसाठी होणाऱ्या अधिवेशनासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग (१)ने ८५ कोटींच्या खचार्चा आराखडा तयार केला आहे. शेवटच्या टप्प्यात हा खर्चाचा आकडा ९०-१०० कोटींच्या घरात जाणार असल्याचे सांगण्यात येते.

**निमबाह्य खर्च होत असल्याचे आरोप**

अधिवेशनाच्या नावावर वारेमाप आणि नियमबाह्य खर्च करण्यात येत असल्याचा आरोप नेहमी होतात. 'कोटेशन'च्या नावावर अनेक बोगस कामे केल्याची तक्रार आमदार विकास ठाकरे यांनी केली आहे हे येथे उल्लेखनीय.

**अधिकारी म्हणतात**

गेल्या वर्षीच्या तुलनेच यंदा कमी खर्चाचाच आराखडा तयार करण्यात आला आहे. खर्च कमी करण्यासंदर्भात अद्याप कुठल्याही सूचना नाहीत, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग-१ चे प्रभारी कायकारी अभियंता प्रशांत शंकरापुरे यांनी सांगितले.

# 'तुम्ही नाही म्हणा की हो म्हणा, मी उभा राहणारच' कराळे मास्तर सांगतात, शरद पवार भेटीचे सत्य

**प्रतिनिधी**

**नागपूर:**वर्धा, नागपूर पदवीधर मतदारसंघातील लढाई बंडखोरीनेच अधिक गाजू लागली आहे. महायुतीचे सुधाकर कोहळे व बंडखोर प्रा. अनिल सोले तर महाआघाडीचे अभिजित वंजारी तर बंडखोर नीलेश कराळे उर्फ खदखद मास्तर. असे हे चौघे रिंगणातील चर्चित उमेदवार आहेत. सोले यांनी भाजपच्या तर कराळे यांनी आघाडीच्या नाकात नऊ आणल्याचे म्हटल्या जाते. कराळे हे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस आहेत. उमेदवारी दाखल करण्यापूर्वी त्यांनी पक्षनेते शरद पवार यांची भेट घेऊन भूमिका मांडली होती.

**महाराष्ट्रातून कुठेही द्या**

या संदर्भात बोलतांना कराळे म्हणतात की मी पक्षाकडे अधिकृत उमेदवारी मागितली होती. नंतर आदरणीय शरद पवार यांना भेटलो. त्यांना विनंती केली मला उमेदवारी मिळाली पाहिजे. ही जागा आपल्याकडे घ्या व मला लढवा. नागपूर नाही तर महाराष्ट्रातून कुठूनही द्या. मला राज्यात ओळखल्या जाते. मराठवाड्याची जागा रिकामी आहे, तिथून लढवा. नागपूरात मी ३५ हजार अर्ज भरले. तेव्हढे पक्के मतदार व अधिक माज्या कामामुळे मिळतील. तेव्हा पवार साहेब म्हणाले की नागपूर येथून काँग्रेसचे विद्यमान आमदार



आहेत. ती जागा ते सोडणार नाही. उभे राहल्यास निवडून येणार कां, असा प्रश्न त्यांनी केला होता.

**माझा दावा असा की**

कराळे मास्तर पूढे सांगतात की शरद पवार यांना मी भेटीत स्पष्ट केले होते की मला लोकसभा, विधानसभा निवडणुकीत तिकीट दिले नाही. तरीही मी पक्षासाठी पायाला भिंगरी लावून फिरलो. अनेक पोलीस केसेस माज्यावर दाखल झाल्या. चिंता केली नाही. आज माझी विनंती मान्य करा. मला संधी द्या. तुम्ही ह? म्हणा की नाही, मी नागपुर पदवीधर मतदारसंघातून उभा राहणारच. असे सांगितले व निघालो. पक्षाने तिकीट नाकारली तरी मी उभा झालो. कारण ज्यांचे मतदार म्हणुन अर्ज भरले त्यांना पण नाराज करायचे नव्हते. त्यांचा अपमान करायचा नव्हता.

**पक्षाची नोटीस नाही**

उमेदवारी नाकारली तरीही उभे झालात तर पक्षाने नोटीस बजावली कां, या प्रश्नावर कराळे म्हणतात नोटीस वगैरे काही नाही. मी सांगूनच आलो नां की उभा राहणारच. आता मी पुर्ण तयारीने कामास लागलो आहे. यावेळी पदवीधर मतदारसंघात बदल घडेलच. माझे नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यात कार्यकर्ते कामास लागले आहे. यात ६५ तालुके येतात. प्रत्येक ठिकाणी माझे काम सूरू आहे. निश्चित बदल घडेल. माझी काम करणारा, मदतीस धावून जाणारा, व्यक्तिगत स्नेह ठेवणारा, परिचित चेहरा अशी ओळख आहे. तरुणाई पाठीशी आहे. मी अन्याय विरोधात लढणारा आहे, म्हणुन संधी मतदार मलाच देतील, असा विश्वास कराळे व्यक्त करीत आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नूतनीकरणासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**प्रतिनिधी**

**नागपूर:** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, त्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेताना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य आणि निर्वाह भत्ता यासारख्या आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासनातर्फे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' राबवली जाते. या योजनेंतर्गत मिळणारी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा केली जाते. वर्ष २०२५-२६ मध्ये या योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना आता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील लाभासाठी ऑनलाइन नूतनीकरण (RYenewa') अर्ज करण्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी आपला ऑनलाइन नूतनीकरण अर्ज https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन १५ ऑक्टोबरपर्यंत भरावा आणि योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.

# आमदारकी असूनही मतदानाचा हक्क नाही; नागपूर पदवीधर मतदारसंघात १४ आमदार मतदार यादीबाहेर

**प्रतिनिधी**

**नागपूर:** विधानपरिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघाची निवडणूक राजकीयदृष्ट्या रंगत असताना सहा जिल्ह्यांतील १४ आमदार मात्र मतदानाच्या प्रक्रियेपासून दूर राहणार आहेत. प्रचारातील त्यांची भूमिका महत्त्वाची असली, तरी पदवीधर नसल्याने त्यांना मतदान करता येणार नाही.

**सहा जिल्ह्यांतील ३२ आमदार; १४ जण मतदार नाहीत**

नागपूर पदवीधर मतदारसंघात नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. या सहा जिल्ह्यांतून विधानसभेवर निवडून आलेले एकूण ३२ आमदार आहेत. त्यापैकी १४ आमदार पदवीधर नसल्याने ते या निवडणुकीत मतदान करू शकणार नाहीत.

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आमदारपद किंवा अन्य राजकीय पदापेक्षा मतदार म्हणून नोंदणीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेला महत्त्व असते. त्यामुळे विधानसभेत लोकप्रतिनिधी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या या आमदारांना या निवडणुकीत मतदार म्हणून सहभागी होता येणार नाही.

**नागपुरातील पाच आमदारांचा समावेश**

नागपूर जिल्ह्यातील पाच आमदार पदवीधर मतदारांच्या यादीबाहेर आहेत. यात मध्य नागपूरचे प्रवीण दटके, नागपूर पूर्वचे कृष्णा खोपडे, कामठीचे चंद्रशेखर बावनकुळे, काटोलचे चरणसिंह ठाकूर आणि नागपूर दक्षिणचे मोहन मते यांचा समावेश आहे. यापैकी प्रवीण दटके यांनी पदविका प्रथम वर्ष, कृष्णा खोपडे यांनी सातवी, चंद्रशेखर बावनकुळे यांनी बी.एस्सी. प्रथम वर्ष, चरणसिंह ठाकूर यांनी बारावी, तर मोहन मते यांनी आयटीआयपर्यंत शिक्षण घेतले आहे.



**भंडारा-गोंदियात निम्म्याहून अधिक आमदार मतदानापासून दूर**

भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांपैकी चार आमदार पदवीधर मतदार नाहीत. यात साकोलीचे काँग्रेस आमदार नाना पटोले, तुमसरचे राजू कारेमोरे, गोंदियाचे विनोद अग्रवाल आणि आमगावचे संजय पुराम यांचा समावेश आहे. याशिवाय गडचिरोलीचे अहेरी मतदारसंघाचे धर्मरावबाबा आत्राम, चंद्रपूरचे किशोर जोरगेवार, ब्रह्मपुरीचे विजय वडेट्टीवार, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाटचे समीर कुणावार आणि देवळीचे राजेश बकाने यांनाही मतदान करता येणार नाही. या आमदारांची राजकीय समीकरणे आणि प्रचारातील भूमिका मात्र महत्त्वाची ठरणार आहे.

**दोन खासदारही मतदानापासून वंचित**

या निवडणुकीत दोन खासदारांनाही मतदान करता येणार नाही. राज्यसभेच्या खासदार माया इवनाते यांचे शिक्षण पाचवीपर्यंत झाले आहे, तर रामटेकचे लोकसभा खासदार श्यामकुमार बर्वे यांनी बी.ए. द्वितीय वर्षापर्यंत शिक्षण घेतले आहे. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानासाठी संबंधित शैक्षणिक पात्रता पूर्ण करणे आणि मतदार म्हणून नोंदणी असणे आवश्यक असल्याने केवळ लोकप्रतिनिधी असल्यामुळे मतदानाचा अधिकार मिळत नाही. त्यामुळे प्रचारात सक्रिय असलेले हे लोकप्रतिनिधी स्वतः मात्र मतदान प्रक्रियेपासून दूर राहणार आहेत.

# नागपूर विमानतळावर सोने, घड्याळींसोबतच केशराची तस्करी; १० कोटींचे साहित्य जप्त



**प्रतिनिधी**

**नागपूर:**सर्वसाधारणतः हवाई मागार्ने सोने व इतर दागिन्यांच्या तस्करीवर चोरांचा भर असतो. मात्र, नागपुरात विमानाने चक्क केशरदेखील आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर मागील साडेतीन वर्षांत सीमाशुल्क विभागाने सोन्यासह केशर, मोबाइल आणि घड्याळांची तस्करी रोखत तब्बल ९.८६ कोटी रुपयांचे साहित्य जप्त केले आहे. १ जानेवारी २०२३ ते १५ जुलै २०२६ या कालावधीतील ही आकडेवारी माहितीच्या अधिकारातून समोर आली आहे. नागपूर येथील सीमाशुल्क आयुक्तालयाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांना ही माहिती दिली. विमानतळावर जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये सोन्याचे प्रमाण आणि त्याची किंमत सर्वाधिक आहे.

**तीन वर्षात १४.९९६ किलो सोने जप्त**

तीन वर्षांच्या कालावधीत १४.९९६ किलो सोने जप्त तीन वर्षांच्या कालावधीत १४.९९६ किलो सोने जप्त करण्यात आले. त्याची किंमत तब्बल ९.२४१ कोटी रुपये इतकी आहे. सोन्याच्या तस्करीशी संबंधित कारवायांमध्ये सात जणांना अटक करण्यात आली व नंतर सातही जणांना सोडण्यात आले. सोन्याच्या तुलनेत अन्य वस्तूंचे प्रमाण कमी असले तरी विमानतळावर विविध प्रकारच्या प्रतिबंधित अथवा बेकायदा आयात-निर्यातीवर सीमाशुल्क विभागाची नजर असल्याचे या कारवायांतून दिसून येते. विमानतळावर आंतरराष्ट्रीय प्रवाशांची वाढती संख्या, विविध देशांशी वाढणारी हवाई जोडणी आणि सोने व इतर उच्च मूल्य वस्तूंच्या तस्करीचे आर्थिक आकर्षण लक्षात घेता, पुढील काळात प्रवासी तपासणी आणि गुप्तचर यंत्रणेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

**केशर, मोबाइल आणि घड्याळेही जप्त**

सीमाशुल्क विभागाने ८ किलो केशर जप्त केले असून, त्याची किंमत १७.५ लाख रुपये होती. याशिवाय ४५ मोबाइल फोन जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत ४२.२ लाख रुपये होती. तसेच ७ घड्याळे जप्त करण्यात आली असून, त्यांची किंमत ३.१ लाख रुपये आहे. चांदीच्या जप्तीची नोंद मात्र या कालावधीत शून्य आहे.

**तस्करीचा बदलता पॅटर्न?**

या आकडेवारीकडे केवळ जप्तीची संख्या म्हणून न पाहता विमानतळावरील तस्करीच्या बदलत्या पॅटर्नच्या दृष्टीनेही पाहण्याची गरज आहे. सोन्याबरोबरच केशर, मोबाइल आणि महागडी घड्याळे अशा वेगवेगळ्या वस्तूंची जप्ती झाली आहे. त्यामुळे सीमाशुल्क विभागासमोरील आव्हान केवळ सोन्यापुरते मर्यादित नसल्याचे दिसते.


भंडारा शहरात २५ वर्षापासून सेवा
लेजर व क्षारसुत्र सेन्टर
डॉ. धरमसारे पाईल्स हॉस्पिटल
डॉ. चंद्रकांत धरमसारे
शनिवार बंद
मुळव्याध भगंदर तज्ञ (BAMS, CCKS)
वेळ:- सकाळी 10.00 ते दु. 2.00 व सायं. 6.00 ते रात्री 8.00
पत्ता:- पाटीदार भवनजवळ, गुजराती कॉलनी, भंडारा.
मो. 9421710177, 7507128106


## जाहीर नोटीस

सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, मौजा दिघोरी, ता.व जि. भंडारा, ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन क्रमांक ४३४/अ/३, खाते क्रमांक १०१४२ मधील प्लॉट क्रमांक ३, क्षेत्रफल ४५५.७८ चौ.मी. (लांबी-रुंदीः पूर्व २८.७५ मी., पश्चिम २९.२५ मी., उत्तर १६ मी., दक्षिण १६ मी.) ज्याची चतु:सिमा - पूर्वेस खाली जागा, पश्चिमेस ९.०० मी. ले-आउट रोड, उत्तरेस रोड, दक्षिणेस प्लॉट नं.४, ही मिळकत श्री. ईजाजखान वल्द गुलाम युसुफ खान, रा. जमनालाल बजाज वार्ड, भंडारा यांचे मालकी व वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत माझे पक्षकार श्री. निकेश हिरामण जगनाडे, वय ३३, रा. दिघोरी ता.जि. भंडारा यांना विक्रीचा सौदा केला आहे.

सदर मिळकतीचा सौदा दिनांक १२/०५/२०२६ रोजी करारनामा करून रुपये ५,००,०००/- बयाना घेऊन पक्का झाला असून उर्वरित मोबदला घेऊन ७ महिन्यात रजिस्ट्री करण्याचे ठरले आहे.

तरी सदर प्लॉटवर कोणाचा कोणताही हक्क, वारसा, गहाण, बोजा, लिन, अटॅचमेंट, वाद असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर मूळ पुराव्यासह कळवावे, मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

**स्थळ: भंडारा,**
**दिनांक: १०/१०/२०२६**

**श्री. निकेश हिरामण जगनाडे यांचेतर्फे**
**अ‍ॅड. श्री. विजय एस. रेहपाडे**
**पत्ता: सर्वश्री नगर, दिघोरी, नागपूर. ३४**
**मो. ९७६३४१३३२०**


दै. भंडारा पत्रिका नियमित वाचा !


## E-Tender Notice

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | TIC-I ODP Solar/ Rfx No.3000072489(Refloated)/Work of Rewinding and Repair of 1250 KVA, 415 V/33KV HT Transformer at 5 MWp Thin Film Solar Power Plant, Chandrapur./Rs.845000.00/- |
| 2 | EM-III/ Rfx No.3000072455/Works of maintenance and allied works of HT auxiliaries installed at TG House and outdoor plant on as & when required basis at Unit-8&9, CSTPS, Chandrapur/ Rs.3103034.23/- |
| 3 | CHP-B/ Rfx No.3000072527(Refloated)/Annual contract for Work of restoring the maximum working storage capacity of Bunkers of Unit 5, 6 & 7 at CHP-B, CSTPS, Chandrapur FOR 2 YEARS/ Rs. 22032325.82/- |
| 4 | TM-III/ Rfx No.3000072567/Procurement of special Monorail Hoist for HPCF, Vacuum Pump and ETP pump house of Unit#8&9 , CSTPS Chandrapur./ Rs.1236145.00/- |
| 5 | I&C-II/ Rfx No.3000072566/Procurement of Position Feedback Transmitters for TDBFP's Main Control valve at Unit-5,6&7, CSTPS, Chandrapur on Open Tender basis./ Rs.1999200.00/- |
| 6 | WTP-II/ Rfx No.3000072543/Supply of Laboratory Fine Chemicals at WTP-II, CSTPS, Chandrapur./ Rs.668679.00/- |

Above floated tenders are published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in** for (Sr. No. 01 to 6)

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**